जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 OCT 2023

लोकमत

विद्यापीठात अभ्यासक्रम : चार वर्षांत साडेतीनशे विद्यार्थ्यांनी घेतले शिक्षण

# विद्यापीठातील 'विदेशी भाषा', विद्यार्थ्यांना दिली रोजगाराची दिशा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एकीकडे भाषेच्या बाबतीत प्रादेशिक अस्मितेचे नगारे वाजवले जात असताना दुसरीकडे मात्र, शिवाजी विद्यापीठातील अनेक विद्यार्थ्यांनी सातासमुद्रापलीकडची भाषा शिकून रोजगाराच्या संधी मिळवल्या आहेत. शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातून गेल्या चार वर्षांत साडेतीनशे विद्यार्थ्यांनी रशियन, जपानी, जर्मन व फ्रेंच भाषेमधून शिक्षण घेत जगभरातील नोकरीच्या संधी जवळ केल्या आहेत.

विद्यापीठात १९७० मध्ये रशियन भाषा केंद्राची स्थापना झाली. त्यानंतर १९९८ मध्ये विदेशी भाषा विभाग सुरू करण्यात आला. त्याच वर्षी जर्मन व जपानी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला. तर २००० मध्ये फ्रेंच भाषेचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला. जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात स्पर्धा आहे. त्यामुळे शैक्षणिक पात्रतेला एखाद्या विदेशी भाषेची जोड दिली तर जगभरातील नोकरीच्या स्पर्धेत आपण टिकू शकतो. त्यामुळे अनेक विद्यार्थी, नोकरदारांचा विदेशी भाषा शिकण्याकडे कल वाढला आहे. २०१९ ते २०२२ या चार वर्षांत ३४० विद्यार्थ्यांनी विदेशी भाषा विभागातून शिक्षण पूर्ण केले आहे.



## अभ्यासक्रमाचे स्वरूप

- रशियन, जपानी भाषा पदविका अभ्यासक्रम -एक वर्ष
- रशियन भाषेचा उच्च पदविका अभ्यासक्रम-एक वर्ष
- जर्मन भाषा पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम-एक वर्ष
- रशियन भाषा अभ्यासक्रमातून पीएच.डी.

## विदेशी भाषा येत असल्यास पटकन मिळते नोकरी

आयटी, मेकॅनिकल, हॉटेलिंग क्षेत्रात जगभरात मोठ्या संधी आहेत. मात्र, परदेशात स्थानिक भाषेची अडचण येत असल्याने भारतातील विद्यार्थ्यांना नोकरी मिळणे कठीण होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विदेशी भाषा विभागातून अभ्यासक्रम पूर्ण केल्यास परदेशात पटकन नोकरी मिळू शकते.

विदेशी भाषेचे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या मोठी आहे. जगभरात रोजगार उपलब्धतेसाठी त्यांना लाभ होतो. विदेशी विभागात शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी नामवंत कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत.

- डॉ. प्रा. मेघा पानसरे, विभागप्रमुख विदेशी भाषा विभाग, शिवाजी विद्यापीठ.

## कुठे आहेत नोकरीच्या संधी

विदेशी भाषेचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना जगभरात नोकरीच्या संधी आहेत. साहित्य अनुवाद करणाऱ्यांना वाढती मागणी आहे. शिवाय भाषांतरकार, दुभाषिक या पदांवरही नोकरीच्या वाढत्या संधी आहेत.

लोकमत

# विधि विभागाच्या विद्यार्थ्यांची विधि सेवा प्राधिकरणास भेट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विधि विभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा विधि सेवा प्राधिकरणास भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. पक्षकारांमध्ये आपसात तडजोडीने वाद मिटवून त्यांना न्याय मिळवून देण्यास वकिलांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन प्राधिकरणचे सचिव न्यायाधीश प्रीतम पाटील यांनी केले.

यावेळी प्राधिकरणचे सचिव न्यायाधीश प्रीतम पाटील आणि विद्यापीठातील विधि विभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ॲड. सी. आर. बुधले, ॲड. प्रमोद दाभाडे, कार्तिक कुलकर्णी उपस्थित होते.

लोकमत

# 'ज्ञानाचा वापर शाश्वत विकासासाठी करावा'

कोल्हापूर : विद्यापीठ व महाविद्यालयांनी ज्ञान, कौशल्य व संशोधनाचा वापर ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी केला पाहिजे असे आवाहन शाश्वत ग्रामविकास तज्ज्ञ डॉ. कैलास बवले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि शिक्षणशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'उच्चशिक्षण संस्थांतील ग्रामीण विकासाचा दृष्टिकोन' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. एस. महाजन होते. प्रा. पी. एस. पाटणकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी प्रास्ताविक, प्रा. अविनाश भाले यांनी आभार मानले. डॉ. भालबा विभूते, प्रा. आर. जी. पवार, डॉ. विलास सोयाम, डॉ. अमोल महापुरे, डॉ. रुपाली संकपाळ, डॉ. तेजपाल मोहरेकर, डॉ. प्रताप खोत, प्राची पाटील यावेळी उपस्थित होते.